# हिंदू महिला सभेच्या वतीने सर्व भक्तांचे हार्दिक स्वागत

हिंदू महिला सभा

## नवरात्र महोत्सव २०२५

७५ वा नवरात्र महोत्सव अमृत महोत्सवी वर्ष



देवी शारदांबा (शृंगेरी)

सर्वमंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।



# हिंदू महिला सभा, पुणे

## कार्यकारिणी सदस्य

मागची ओळ डावीकडून उजवीकडे

**प्राची सप्रे** - कार्यकारिणी सदस्य, **वंदना जोगळेकर** - कार्यकारिणी सदस्य,

**यश:श्री आठवले** - उपाध्यक्ष, **स्मिता नातू** - कार्यवाह, **मृणाल गोडबोले** - कार्यकारिणी सदस्य,

पुढील ओळ डावीकडून उजवीकडे

**सुनीता अभ्यंकर** - कोषाध्यक्ष, **सुधा राजगुरू** - कार्यकारिणी सदस्य, **सुप्रिया दामले** - अध्यक्ष,

**मधुरा जोगळेकर** - उपाध्यक्ष , **श्रद्धा कर्वे** - कार्यवाह, **तृप्ती कैसरे** - कार्यकारिणी सदस्य


**नवरात्र महोत्सवास हार्दिक शुभेच्छा**

**श्री. ओमप्रकाश मधुसूदन मोडक**

अध्यक्षीय...

विद्या, कला, शक्तीच माहेरघर असणारे पुणे शहर, त्यात सुप्रसिद्ध सदाशिव पेठेत असणाऱ्या शिवाजी मंदिरात स्वा. सावरकरांच्या प्रेरणेतून स्थापन झालेल्या हिंदू महिला सभेला यंदा ९० वर्षे पूर्ण होत आहेत आणि विचाराने काळाच्याही पुढे असणाऱ्या स्वा. सावरकरांनी त्या काळात महिलांनी एकत्र यावं यासाठी नवरात्र महोत्सव सुरू केला त्याला यंदा ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. त्या निमित्ताने यावर्षी संस्मरणीय अशी स्मरणिका प्रकाशित करावी असा विचार आमच्या कार्यकारिणी मंडळात ठरला. यासाठी संपादक मंडळ स्थापन झालं. अनेकानेक दिग्गजांनी आमच्या विनंतीवरून अत्यंत वाचनीय असे लेख या स्मरणिकेसाठी दिले आहेत. त्यांचे आम्ही शतशः ऋणी आहोत. आमच्या संस्थेच्या काही सभासदांनीही उस्फूर्तपणे कविता, लेख दिले आहेत. या स्मरणिकेच्या छपाईचा थोडाफार आर्थिक भार काही जाहिरातदारांनी नेहमीप्रमाणेच उचलला आहे, त्याचप्रमाणे स्मरणिकेच्या कामात ज्यांचे ज्यांचे हातभार लागले आहेत त्या सर्वांनाच कृतज्ञतापूर्वक वंदन करते.

हिंदू महिला सभेच्या आद्य कार्यकारी सदस्यांनी लावलेल्या रोपट्याचा आज वटवृक्ष होऊ पाहतोय. कै. हिमानीताई सावरकर यांनी त्यांच्या अध्यक्षीय अधिकारात काळानुसार अनेकानेक चांगले बदल करत संस्थेची धुरा समर्थपणे सांभाळली. त्यांच्या निधनानंतर (त्यावेळी उपाध्यक्ष असल्यामुळे) ही संस्थेची जबाबदारी माझ्या खांद्यावर आली. माझ्या कुवतीप्रमाणे, शक्य होईल त्याप्रमाणे, संस्था चांगल्या रीतीने वाढवण्याचा मी प्रयत्न करत आहे आणि संस्थेची सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करत आहे. अर्थातच कार्यकारिणीतील इतर सदस्यांची मला उत्तम साथ असतेच. त्यांव्याशिवाय मी काहीच करू शकणार नाही. संस्थेच्या कार्यकारिणीमध्ये फक्त महिलाच असूनही एकमेकींवर कुरघोडी न करता एक जुटीने, बरोबरीने काम करणाऱ्या महिला म्हणून आम्हाला अनेकांकडून शाबासकीची थाप मिळालेली आहे. त्यावेळी कृतकृत्य झाल्यासारखं वाटतं. शेवटी एखादी संस्था उत्तम प्रकारे काम करते म्हणजे त्या संस्थेतील सर्वांचे उत्तम टीमवर्क आणि संस्थेच्या कोणत्याही कामात असणारी अत्यंत पारदर्शकता !!! त्यामुळेच संस्था चांगल्या प्रकारे नावारूपाला येऊ शकते आणखी एक उल्लेख मला आवर्जून करावासा वाटतो तो म्हणजे--संस्थेच्या या वाटचालीमध्ये पहिल्यापासून आमच्या परिवारातले असणारे कै. वैशंपायन गुरुजी आणि आता त्यांचा मुलगा शैलेश गुरुजी, त्याचप्रमाणे आमच्या नवरात्र महोत्सवाच्या संपूर्ण नऊ दिवसाच्या कार्यक्रमाची ध्वनी मुद्रण व्यवस्था सांभाळणारे श्री संजय बेंद्रे यांचाही संस्थेच्या उज्वल वाटचालीमध्ये तितकाच महत्त्वाचा वाटा आहे.

स्वातंत्र्यपूर्व काळात फक्त महिलांनी चालवलेली ही सामाजिक संस्था आता शतकमहोत्सवी वर्षाकडे यशस्वी वाटचाल करत आहे, याचे कौतुकही अनेक संस्थानी केले आहे आणि आपण ह्या संस्थेचा एक भाग आहोत याचा मला अतिशय अभिमान वाटत आहे. संस्थेच्या सांस्कृतिक कार्यक्रमात अनेक मोठे कलाकार संस्थेच्या बॅनर खाली कार्यक्रम करायला तयार असतात. आम्ही सर्वजणी समाजासाठी निस्वार्थीपणे करत असलेल्या कामाची ही पोचपावती आहे अस मला वाटते. आपल्यासारखे पाठीराखे, हितचिंतक संस्थेवर प्रेम करणारे शुभचिंतक, यांच्या हाती ही सन्मानिका देताना आम्हाला खूप आनंद व समाधान होत आहे. आपला संस्थेवरील लोभ असाच कायम राहू देत आणि आपल्याला उत्तम आयुरारोग्य लाभू देत ही देवीचरणी प्रार्थना धन्यवाद्।

**सौ. सुप्रिया अनिल दामले**
अध्यक्षः – हिंदू महिला सभा, पुणे

# श्रद्धांजली



संस्थेच्या कार्यकारणीतील माजी सदस्य श्रीमती सरिता शरद बापट यांचे ऑक्टोबर २०२४ मध्ये वृद्धापकाळाने निधन झाले त्या संस्थेच्या जुन्या सदस्य होत्या. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करून हिंदू महिला सभेच्या कार्यकारणी सदस्य त्यांना श्रद्धांजली अर्पण करत आहेत, यावर्षीच्या अमृत महोत्सवी नवरात्र महोत्सवात त्यांची उणीव नक्कीच जाणवेल. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो ही देवीचरणी प्रार्थना.!

दरवर्षी संस्थेच्या नवरात्र महोत्सवात प्रत्येक माळेला उद्घाटक म्हणून वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या महिलांना (दुर्गांना) आम्ही आमंत्रित करत असतो.

## सन्माननीय दुर्गा
## पुण्यातील महिला रिक्षा चालक

| | | |
|---|---|---|
| मंगळवार<br>२३/०९/२५ | दुसरी माळ | शारदा सावंत |
| बुधवार<br>२४/०९/२५ | तिसरी माळ | दिपाली कडू |
| गुरुवार<br>२५/०९/२५ | चौथी माळ | शशिकला पवार |
| शुक्रवार<br>२६/०९/२५ | पाचवी माळ | मनिषा शिंदे |
| शनिवार<br>२७/०९/२५ | सहावी माळ | जया भिलारे |
| रविवार<br>२८/०९/२५ | सातवी माळ | मोनिका देशमाने |
| सोमवार<br>२९/०९/२५ | आठवी माळ | |
| मंगळवार<br>३०/०९/२५ | नववी माळ | ज्योती हुम्बे |
| बुधवार<br>०१/१०/२५ | | मंगल गोरखे |

# हिंदू महिला सभा, पुणे

कार्यक्रम स्थळ : श्री शिवाजी मंदिर (नवीन वास्तू) १२३२, सदाशिव पेठ, पुणे ३०

http://www.hindumahilasabha.in

80G No. AAATH4714jf19847 (REGD. NO. - F 1859)

हिंदू महिला सभा

वर्ष ७५ वे

सन २०२५

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सोमवार | २२/०९/२०२५ | सकाळी ९.०० | घटस्थापना | हस्ते – सौ. अनया व श्री. वरूण रिसबुड |
| | | सायं. ५.०० | स्मरणिका प्रकाशन<br>'मिश्किली आणि कविता' | हस्ते – श्री. अशोकजी नायगांवकर<br>सादरकर्ते – श्री. अशोकजी नायगांवकर |
| मंगळवार | २३/०९/२०२५ | सायं. ५.३० | स्वरस्वप्न प्रस्तुत 'द्वैता' | व्हायोलिनचा कार्यक्रम – सादरकर्त्या व संकल्पना – स्वप्ना दातार |
| बुधवार | २४/०९/२०२५ | सायं. ५.०० | स्वरमयी प्रस्तुत 'गीत गुंजन' | सुगम संगीतातील गीत प्रकारांवर आधारित हिन्दी व मराठी गीते<br>सादरकर्त्या – राजश्री ताम्हनकर आणि सहकलाकार महिला विद्यार्थीनी |
| गुरुवार | २५/०९/२०२५ | सायं. ५.३० | 'मागे वळून पाहताना' | गाणी, गप्पा, आठवणी आणि किस्से सादरकर्ते – डॉ. नरेंद्र चिपळूणकर आणि सहकारी |
| शुक्रवार | २६/०९/२०२५ | सकाळी ९ वा. | नवचंडी याग | हस्ते – सौ. यशश्री आणि श्री.सुयोग आठवले |
| | | सायं. ५.३० | 'कीर्तन' | सादरकर्त्या – ह.भ.प. सौ. रेशीम खेडकर |
| शनिवार | २७/०९/२०२५ | सायं. ५.३० | 'साहित्यातील लोकरंग' | ओवी, पाळणा, धावा, वासुदेव, जागरण गोंधळ, पोवाडा<br>डॉ. रामचंद्र देखणे साहित्य कला प्रतिष्ठान प्रस्तुत –<br>सादरकर्ते – डॉ. श्री भावार्थ देखणे, सौ. पुजा देखणे आणि सहकारी |
| रविवार | २८/०९/२०२५ | सकाळी ९.०० | देवीयाग | हस्ते –सौ. श्रुती व श्री. प्रतिक पोळेकर |
| | | सायं. ५.३० | 'बालचमुचे गीतरामायण' | कलायन कल्चर सेंटर पुणे प्रस्तुत – संकल्पना – भाग्यश्री आशिष केसकर |
| सोमवार | २९/०९/२०२५ | सकाळी ९ वा | | महालक्ष्मी पूजन |
| | | सायं. ७ ते १२ | | महालक्ष्मी पूजन |
| मंगळवार | ३०/०९/२०२५ | सायं. ५.३० | 'आदिशक्तीचा जागर' | संगीतानंद प्रस्तुत – सादरकर्त्या – ज्योती देशमुख आणि सहकारी |
| बुधवार | ०१/१०/२०२५ | सायं. ५.३० | 'आमच्या संग्रहातून' | आकाशवाणीवरून प्रसारीत झालेली गाणी आणि आठवणी<br>सादरकर्त्या – चैत्राली अभ्यंकर आणि प्रभा जोशी |
| गुरुवार | ०२/१०/२०२५ | | दसरा | दसरा |

## 'देवी संचार' एक अनुभव

सौ. कमलताई गाडगीळ यांच्या अंगात देवीचा संचार १९३९ साठी त्यांचे लग्न झाल्यापासून होत असे. प्रथम वर्षी सकाळी पूजा केली व संध्याकाळी नातू पहायला जायचे तर देवी उभी राहिल्याबरोबर यांच्या अंगात देवीचा संचार सुरू झाला. त्या अगदी शांत एका जागी उभी राहून घागर फुंकत असत.

सांगलीला साधारण १९५० च्या सुमारास महालक्ष्मी आपल्या घरी उभी करायचे असे ठरले. महालक्ष्मीची सर्व तयारी जय्यत करून झाली, पण महालक्ष्मी उभी राहिना. माझ्या सासुबाई चुलत सासूबाई सगळ्या अस्वस्थ दिसत होत्या. शेवटी त्यांनाच कारण विचारले तेव्हा त्या म्हणाल्या, माझ्या आधी सरस्वतीला आणायचे विसरले आहे. तिची आधी पूजा करा, मग महालक्ष्मी उभी राहिली. नवरात्रातील सप्तमीला सरस्वती आवाहन, अष्टमीला पूजन व नवमीला बलि दान व संध्याकाळी विसर्जन असे. आमच्या घरी पोथ्या, गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध असे ग्रंथ हे मांडले जातात. त्याची पूजा दुसऱ्या दिवशी अष्टमीला असते व नवमीला बलि दान व विसर्जन, बलि दानाला नारळ वाढवायचा, त्याचा प्रसाद करून नैवेद्य दाखवायचा व अक्षता टाकून दुपारी विसर्जन करायचे. मग लगेच जमीन सारवून पोथ्या मांडल्या. त्यांची पूजा केली व मग महालक्ष्मी उभी राहिली. हा प्रसंग अष्टमीला नेहमी आठवतो व आम्ही अजूनही सरस्वती पूजन करतो.

१९५८ साली पुण्यात आल्यावर शिवाजी मंदिर येथे जाण्यास सुरुवात केली. माझ्या लग्नाच्या आधी साधर १९६५ साली त्यांना मासिक पाळीची अडचण आली. दिवसभर उपवास केला पण मनात रुखरुख होती, यंदा देवीचे दर्शन होणार नाही. अशाच द्विधा मनस्थितीत त्या झोपल्या. दाजीकाका, माझे सासरसे दर्शन घेऊन आले व ते पण झोपले. रात्री बाराच्या सुमारास बोलण्याच्या आवाजाने ते जागे झाले तर सासूबाई बोलत होत्या. मला येता आले नाही पण तू आलीस व मला दर्शन झाला. आता मन प्रसन्न झाले. दाजीकाकांनी दिवा लावून पाहिले तर संपूर्ण कपाळावर कुंकवाचा मळवट भरला होता. उशीवर पण कुंकू पडले होते, मात्र त्यांनी त्यांच्या बहिणीला उठवले, त्या म्हणाल्या, हा देवीचा संचार आहे. मग सासूबाईंचे आई-वडिल महानोपाध्याय काशिनाथ शास्त्री अभ्यंकर यांना उठवून आणले. आम्ही एकाच वाड्यात रहात होतो. त्यांनी आजींना सांगितले की तू तिची ओटी भर. मग त्यांना जागे केले. ओटी भरली व सर्व शांत झाले. तेव्हापासून त्यांच्या हातातून कुंकू यायला सुरुवात झाली. अजूनही हे सर्व आठवले की अंगावर काटा उभा राहतो.

१९७८ साली दाजीकाका व सासूबाई अमेरीकेला गेले होते व नवरात्रात माझ्या भावाकडे न्यूजर्सी येथे होते. मी वहिनीला अष्टमीची तारीख कळवली होती. त्या दिवशी काही काही कार्यक्रम ठरवू नका असेही सांगितले होते, आदल्या दिवशी ते सर्व भीमसेन जोशी यांच्या गाण्याच्या कार्यक्रमाला गेले होते. तेथे जेवण होते, पण त्या काही जेवल्या नाहीत. आग्रह केल्यावर आता नको वाटते, असे म्हणाल्या. घरी येऊन सर्वजण झोपले. पहाटे, त्या दिवशी बोलायला लागल्या. मी काय करू, इथे देवी उभी नाही. फुंकायला घागर नाही. या बोलण्याने दाजीकाका जागे झाले, तर असेच उशीवर कुंकू सांडले होते. कपाळावर कुंकवाचा महवट. मग दाजीकाकांनी माझ्या भावाला व वहिनीला उठविले. ते पाहून ते आवाक झाले. अष्टमी उद्या, मग आज हे कसे काय ? तर अमेरिका आपल्यापेक्षा मागे असल्यामुळे तिथे आदल्या रात्री हा सर्व प्रकार घडला. वहिनीने अंघोळ करून त्यांची ओटी भरली. मग त्या शांत झाल्या. जगाच्या पाठीवर कोठेही असले तरी त्या वेळेस संचार हा होतोच.

एकदा नवरात्रात त्यांची नातसून माझ्या जाऊबाईंची सून सुखदा ही ललिता पंचमीला बाळंत होऊन मुलगा झाला, त्यामुळे आम्हाला सोयर आले. आता पुढच्या पिढीला या गोष्टी कदाचित माहिती पण नसतील. देवाची पूजा नाही. मग घागर फुंकायला कसे जाणार ? त्या घरीच होत्या, पण १२.१५ ला मध्यरात्री देवी त्यांच्याशी बोलू लागली. आज तुला येता आले नाही. वाईट वाटून घेऊ नको. मी तुझ्यासाठी देवाजसळ प्रसाद ठेवला आहे व सकाळी तो प्रसाद घे, आम्ही शिवाजी मंदिरात जाऊन लांबून देवीचे दर्शन घेतले. त्यांना सकाळी विचारले, देवी कशी दिसली, तर जांभळ्या रंगाची पैठणी नेसलेली व प्रसन्न हसरी मुद्रा होती. खरोखरच देवीला त्याच रंगाची साडी नेसविली होती. सकाळी देवाजवळ कुंकवाची रास होती व बाजूला बाहेर पाण्याची टाकी होती. तेथपासून कुंकवाचा सडा पडला होता. तो देवघरापर्यंत पाहून मन थक्क झाले. शब्द सुचेनात.

त्यांना घागर फुंकायला लागून ५० वर्षे झाली. नेहमीप्रमाणे त्या शिवाजी मंदिरात गेलया. आम्ही रात्री बारा वाजता घरी परत आलो. नंतर आपापल्या खोलीत झोपला. रात्री देवी पुन्हा घरी आली व त्यांना म्हणाले, मी सर्व घर हिंडून आले. खुप प्रसन्न व शांत वास्तु आहे. आता तू शिवाजी मंदिरात न जाता घरी घागर फुंकली तरी चालेल. नाहीतर माझ्याबरोबर येतेस कां ? त्यावर त्या बोलायला लागल्या. घरी देव बसले आहेत. (नवरात्र आहे) तेव्हा मी गावाची वेस ओलांडून कशी येऊ ? दसरा झाल्यावर मग मी तुझ्या दर्शनाला येईन. तुला प्रसाद ठेवते व मी तुझी वाट पहाते. प्रसाद म्हणजे देवासमोर कुंकवाची रास होती.

दसरा झाल्यावर आम्ही कोल्हापूरला अंबाबाईच्या दर्शनाला गेलो. देवळात गेलो, तर आरतीची वेळ होती. दुपारी १२ वाजताची आरती त्या पुजारींनी सांगितले. आता सर्वांनी बसून घ्या. आरती सुरू होणार आहे. आम्ही साडी-चोळीची ओटी भरली. त्यांना घागर दिली. त्यांनी ५ वेळा घागर फुंकली. तेथे पण अंगात आले. हातातून कुंकू निघाले व मग आरती सुरू झाली. आम्ही अगदी गाभाऱ्याच्या बाहेर सर्वांत पुढे बसून हे सर्व झाले व मन समाधान पावले.

श्री महालक्ष्मीची कृपा व आशीर्वाद ! अशीच कृपा सदैव राहो, ही तिच्या चरणी प्रार्थना.

वैशाली गाडगीळ

मोबाईल क्र. : ९८२२४७५७७३

ज्या ईच्छुक महिलांना हिंदू महिला सभा, पुणे या संस्थेचे सर्वसाधारण सभासदत्व हवे असल्यास त्यांना रुपये १०००/- देऊन सभासद होता येईल.

**संपर्क: सौ. यशश्री आठवले ९४२२००४१९५**

आम्ही रोख रक्कम अथवा धनादेशाच्या स्वरुपात देणगी स्विकारतो. संस्थेला दिलेल्या देणग्यांना आयकर कायदा १९६१ च्या अधिनियम देणग्यांना अधिनियम ८० (जी) खाली आयकरात सूट आहे.

संस्थेचा पॅन नं. : AAATH 4714J

कृपया देणगीचे रेखांकीत धनादेश

**हिंदू महिला सभा पुणे** या नावाने काढावेत.

आपली देणगी आमच्या कॅनरा बँक,

सदाशिव पेठ शाखा, पुणे ३०

खाते क्र. ०२६०१०१०१७४८०

IFSC : CNRB0000260 मध्ये NEFT द्वारे पाठवू शकता.

SCAN & PAY

UPI ID: 8841600017480@cnrb

## ❈ मागील वर्षीचा आढावा ❈

हिंदू महिला सभा, पुणे या संस्थेचे सन २०२५ हे नवती महोत्सवी वर्ष तसेच नवरात्रौत्सवाचे अमृत महोत्सवी वर्ष याचे औचित्याने आम्ही प्रत्येक महिन्यात उत्तमोत्तम, दर्जेदार कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

गुरूवार दि. २६ डिसेंबर २०२४ रोजी समर्थभक्त आणि प्रचारक श्री.समीरजी लिमये यांचे 'कॉर्पोरेट कीर्तन'हा कार्यक्रम भरत नाट्य मंदिर येथे आयोजित केला होता.

गुरूवार दि. १६ जानेवारी २०२५ रोजी श्री.श्रीपादजी उंब्रेकर यांचा जेष्ठ गायिका भारतरत्न लता मंगेशकर यांच्या विविध पैलूंचे दर्शन घडविणारा दृकश्राव्य कार्यक्रम एस.एम.जोशी सभागृह येथे आयोजित केला होता.

शुक्रवार दि. २१ फेब्रुवारी २०२५ रोजी भारतीय ट्रान्सजेंडर कार्यकर्त्या व 'सखी चारचौघीच्या' संचालिका श्रीगौरी सावंत यांचा मुलाखतीचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यांची मुलाखत सुप्रसिद्ध मुलाखतकार माधुरीताई ताम्हणे यांनी घेतली. हा कार्यक्रम एस.एम.जोशी सभागृहात झाला.

शनिवार दि. २३ मार्च २०२५ रोजी जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून 'आमचे नवरंगी कर्तृत्व' नामक कार्यक्रमामधे स्वातंत्र्यपूर्व काळात वेताचा मल्लखांब तसेच दोरीवरील मल्लखांब या खेळांचे प्रात्यक्षिक करणाऱ्या भारतातील पहिल्या ९ करमरकर भगिनींच्या (मिरज येथील सुप्रसिद्ध वैद्य श्री.म.द.करमरकर यांच्या ९ कन्या) उत्तुंग यशोगाथेचा प्रवास मुलाखतीद्वारे उलगडला गेला. त्यांना बोलतं करण्याचं कार्य सुप्रसिद्ध संवादिका माधुरीताई ताम्हणे यांनी लीलया पार पाडले. सर्व भगिनी अतिशय मोकळेपणी बोलल्या. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम पार पडला.

शनिवार दि. २६ एप्रिल २०२५ रोजी सुप्रसिद्ध गायिका वृषालीताई मावळंकर यांचा 'गानरसरंग' हा कार्यक्रम संपन्न झाला. त्यांनी गणेशवंदना, प्रार्थना, भक्तीगीत, अभंग, भजन, गवळण, चैती, दादरा, भावगीत, गझल, लावणी तसेच रागदारीवर आधारित काही चित्रपट गीते यासारख्या अनेक गीतप्रकारातून रसरंगाची उधळण केली. वृषालीताई यांना प्रसन्न बाम, यश भंडारे, उद्धव कुंभार, अभिजित जायदे या वाद्यवृंदाची तसेच निवेदिका माधुरीताई कुलकर्णी यांची भक्कम साथ लाभली.

शनिवार दि. १७ मे २०२५ रोजी संध्या. ५ वाजता एस.एम.जोशी सभागृह येथे 'मी प्रतिभा शाहू मोडक' हा श्रीमती प्रतिभाताई शाहू मोडक जैन साध्वी ते सुविद्य पत्नी असा विविधांगी प्रेरणादायी जीवनप्रवास मुलाखतीद्वारे उलगडून दाखविणारा कार्यक्रम आयोजित केला होता. सुप्रसिद्ध मुलाखतकार विनयाताई देसाई यांनी त्यांची मुलाखत घेतली. हा कार्यक्रम 'जीवन कसे जगावे' यासाठी उत्तम मार्गदर्शक ठरला असे म्हणणे वावगे ठरणार नाही.

मे महिन्यामधेच अजून एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शुक्रवार दि. २३ मे २०२५ रोजी संध्या. ५ ते ८ या वेळात यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे श्री.आदित्य ओक आणि श्री.सत्यजित प्रभू यांचा 'जादूची पेटी' हा कार्यक्रम संपन्न झाला. या दोन अद्‌भुत कलाकारांनी तबलावादक श्री.प्रसाद पाध्ये आणि तालवाद्य व ढोलकीपटू श्री.प्रभाकर मोसमकर यांच्या साथीने उपस्थित रसिकांच्या मनावर गारूड केले. या कार्यक्रमाचे अजून एक वैशिष्ट म्हणजे वादकच गप्पांच्या माध्यमातून रसिकांशी संवाद साधत होते. स्वरानंदाचा अभिषेक अविरत चालूच रहावा, कार्यक्रम संपूच नये हीच भावना सर्व रसिकांची होती.

याच कार्यक्रमात आमच्या संस्थेच्या कायम पाठीशी असणाऱ्या १००% पीआरचे संस्थापक श्री.तुषार जोशी, महाराष्ट्र कल्चरल सेंटरच्या संचालिका श्रीमती शुभांगीताई दामले, तेज ॲडव्हरटायझिंगचे संस्थापक श्री.शिरिष अत्रे, तांत्रिक साहाय्य करणारे श्री.आदेश गोखले आणि नाट्यव्यवस्थापक श्री.समीर हंपी यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

शनिवार दि. १४ जून २०२५ रोजी संध्या. ५ वा. एस.एम.जोशी सभागृह येथे 'ऐतिहासिक रामायण' अंतर्गत 'बालकांड' हा अध्याय ज्यात रामजन्म ते सीतास्वयंवर या टप्प्यातील रामाच्या लहानपणातील खरे सत्य शोधण्याचा एक सुंदर प्रवास आदित्य गोखले, आर्यमान लिमये आणि सहकारी (टीम इतिहास) यांनी खगोलीय, भौगोलिक, सामुद्रिक लिखाणांचा आणि घटनांचा शास्त्रीय अभ्यास करून प्रस्थापित निकषांना भेद करून कुशल बुद्धी आणि चातुर्याच्या जोरावर हिंदू संस्कृतीचा नवीन चेहरा सर्वांसमोर आणला. टीम इतिहासच्या सहकाऱ्यांनी अभ्यासपूर्ण सादरीकरणाला 'गीतरामायण' मधील काही गाण्यांची जोड देऊन रसिकांना सांगितिक मेजवानी दिली. या कार्यक्रमाला सुप्रसिद्ध व्याख्यात्या सौ.आरतीताई दातार व श्री.अरूण दातार यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या शेवटी आरतीताईंनी टीम इतिहासचे भरभरून कौतुक केले तसेच पुढील वाटचालीसाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

शनिवार दि. १९ जुलै २०२५ रोजी संध्याकाळी ५.३० वाजता एस.एम.जोशी सभागृहात 'साहस पुरस्कार' आणि 'सजग पुरस्कार' प्रदान सोहळा संपन्न झाला. स्वा.सावरकर यांच्या त्रिखंडात गाजलेल्या उडीचे औचित्य साधून आम्ही दरवर्षी जुलै महिन्यात धाडसी व्यक्तीला 'साहस पुरस्कार' देऊन सन्मानित करतो. पॅराऑलिंपिक सुवर्णपदक विजेते पद्मश्री सन्मानप्राप्त श्री.मुरलीकांत पेटकर हे या साहस पुरस्काराचे मानकरी होते. तसेच आम्ही कै.लीलावती फळणीकर स्मृतीप्रीत्यर्थ उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मा.गौरी धुमाळ, जॉईंट डायरेक्टर इनव्हेस्टीगेशन, हेडक्वार्टर,पुणे यांना सजग पुरस्कार देऊन सन्मानित केले. दोन्ही मान्यवरांना क्रिडामहर्षी मा.डॉ.अरूणजी दातार सर यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले.

या सोहळ्याच्या उत्तरार्धात महाराष्ट्र कल्चरल सेंटर आयोजित लहान मुलांनी लहान मुलांसाठी तयार केलेला बालगोपाळांच्या गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यात विशेष म्हणजे गायक आणि वादक सर्वजण लहान मुलेच होती. कार्यक्रम अतिशय रंगतदार झाला.

असे हे सर्व दर्जेदार मासिक कार्यक्रम आणि ७५ वर्षांची परंपरा सांगणारा यंदाचा आमचा अमृतमहोत्सवी नवरात्रौत्सव हे आमच्या हिंदू महिला सभेच्या कार्यकारिणीच्या निष्ठेचे आणि एकजुटीचे द्योतक आहे. ७५ वर्षांची वाटचाल म्हणजे सनातन सांस्कृतिक परंपरेमागील मर्माची डोळस जाणीव आहे. बदलत्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक मूल्यांचे आणि संदर्भांचे भान ठेवत आम्ही धार्मिक भावना, परंपरा जपत आहोत याचा आम्हांस आनंद आहे.

आम्ही संस्थेच्या वाटचालीचा आढावा घेणारी एक ए.व्ही. तयार केली आहे. प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी आम्ही ती सर्वांना दाखवतो. जास्तीत जास्त लोकांपर्यंत आमचे कार्य पोहचावे हा त्यामागील उद्देश आहे. हे सामाजिक कार्य करताना आम्हास आर्थिक हातभाराची आवश्यकता असतेच. ही ए.व्ही. बघून अनेक लोकांनी आमच्या कार्याची प्रशंसा केली आहे आणि आम्हांस आर्थिक सहकार्य केले आहे. आत्तापर्यंत निखिल नातू, अमृता लिमये, मोनिका पाळंदे, सीमा करकरे, वैशाली गुणे, पद्मजा जोगळेकर यांनी आर्थिक सहाय्य केले आहे. या सर्वांची संस्था शतशः ऋणी आहे.

७५ व्या वर्षांच्या परिपूर्णतेच्या या टप्प्यावर आम्ही एक 'स्मरणिका' काढत आहोत. ह्या स्मरणिकारूपी अमोल ठेव्यात अनेक दिग्गज व्यक्तींच्या लेखांचा समावेश केला आहे.

असा हा अमृतमहोत्सवी नवरात्रौत्सव साजरा करताना या यशाच्या असंख्य मानकऱ्यांचे ऋण ही आमची मर्मबंधातील अमोल ठेव आहे. गेली अनेक वर्ष शिवाजी मंदिरची जागा उपलब्ध करून देणारे श्री शिवाजी मंदिर संस्थेचे व्यवस्थापक यांचे मनःपूर्वक आभारी आहोत. नवरात्रातील कार्यक्रमपत्रिका छपाई करणारे श्री.महेंद्र निफाडकर यांचे मनापासून आभार मानतो. तसेच डी.जी.कॉपीयर्स यांच्या बहुमोल सहकार्यामुळेच आमची स्मरणिका परिपूर्ण रूप घेऊ शकली. आमचे असंख्य देणगीदार, जाहिरातदार आणि हितचिंतक यांच्या स्नेहमय सहकार्यामुळेच नवरात्राच्या अमृत महोत्सवापर्यंतची मजल गाठू शकलो आहोत.

हिंदू महिला सभा, पुणे ही संस्था या सर्वांच्या सदैव ऋणात राहिल.

श्रद्धा कर्वे

सचिव, हिंदू महिला सभा, पुणे

## संस्थेचा अनोखा उपक्रम

## आपल्या दिव्यांग मुलांप्रती सकारात्मकता दाखवणाऱ्या सन्माननीय दुर्गा २०२४



कार्यक्रम सादर करताना ऋचा चितळे



रीना पाटील



जयश्री केसकर



स्नेहा गाडगीळ



रेखा इनामदार साने



चंदना चितळे



आपले घर येथील मुलांसाठी घेतलेले गंमत शिबीर

# * नवरात्र देवीची आरती *

आश्विनशुद्धपक्षीं अंबा बैसली सिंहासनी हो।
प्रतिपदेपासून घटस्थापना ती करूनि हो।
मूलमंत्रजप करूनी भोवतें रक्षक ठेऊनि हो।
ब्रह्माविष्णुरुद्र आईचे पूजन करिती हो।।१।।

उदो बोला उदो अंबाबाई माऊलीचा हो।
उदोकारे गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ।।धृ।।

द्वितीयेचे दिवशी मिळती चौसष्ट योगिनि हो।
सकळांमध्ये श्रेष्ठ परशुरामाची जननी हो।।
कस्तुरीमळवट भांगीं शेंदुर भरूनी हो।
उदोकारें गर्जती सकळ चामुंडा मिळुनि हो ।।उदो।।२।।

तृतीयेचे दिवशी अंबे शृंगार मांडिला हो।
मळकट पातळ चोळी कंठीं हार मुक्ताफळा हो।।
कंठीची पदके कांसे पीतांबर पिवळा हो।
अष्टभुजा मिरविती अंबे सुंदर दिसे लीला हो। उदो।।३।।

चतुर्थीचे दिवशी विश्वव्यापक जननी हो।
उपासकां पाहसी अंबे प्रसन्न अंत:करणीं हो।।
पूर्ण कृपें पाहसी जगन्माते मनमोहिनी हो।
भक्तांच्या माऊली सुर ते येती लोटांगणी हो।।उदो।।४।।

पंचमीचे दिवशीं व्रत तें उपांगललिता हो।
अर्घ्यपाद्यपूजनें तुजला भवानी स्तविती हो।।
रात्रीचे समयी करिती जागरण हरिकथा हो।
आनंदे प्रेम तें आलें सद्भावे क्रिडता हो।।उदो।।५।।

षष्ठीचे दिवशी भक्तां आनंद वर्तला हो।
घेऊनि दिवट्या हस्ती हर्षे गोंधळ घातला हो।।
कवडी एक अर्पितां देसी हार मुक्तफलांचा हो।
जोगावा मागतां प्रसन्न झाली भक्तकुळा हो।।उदो।।६।।

सप्तमीचे दिवशी सप्तशृंगगडावरी हो।
तेथें तूं नांदसी भोवतें पुष्पें नानापरी हो।।
जाईजुई- शेवंती पूजा रेखियली बरवी हो।
भक्त संकटी पडतां झेलूनि घेसी वरचे वरी हो।।उदो।।७।

अष्टमीचे दिवशी अष्टभुजां नारायणी हो।
सह्याद्रीपर्वती पाहिली उभी जगज्जननी हो।।
मन माझें मोहिलें शरण आलों तुजलागुनी हो।
स्तनपान देऊनि सुखी केली अंत:करणीं हो।।उदो।।८।।

नवमीचे दिवशी नवदिवसांचें पारणें हो।
सप्तशतीजप होम हवनें सद्भक्ती करूनी हो।।
षड्रसअन्ने नैवेद्यासी अर्पियेली भोजनी हो।
आचार्य ब्राह्मणा तृप्त केलें कृपेंवरूनी हो।।उदो।।९।।

दशमीच्या दिवशी अंबा निघे सीमोल्लंघनी हो।
सिंहारुढे दारुण शस्त्रें अंबे त्वां घेऊनी हो।।
शुंभनिशुंभादिक राक्षसा किती मारिसी रणी हो।
विप्रा रामदासा आश्रय दिधला तो चरणी हो।।उदा।।१०